**<u>ठळक बातम्या</u>**

- प्रधानमंत्री किसान सन्मान निधी, म्हणजे शेतकऱ्यांच्या कल्याणाप्रति सरकारच्या वचनबद्धतेचा वस्तुपाठ असल्याचं प्रधानमंत्र्यांचं प्रतिपादन; वाराणसी इथं २ हजार २०० कोटी रुपये खर्चाच्या विकासकामांचं उदघाटन आणि लोकार्पण

- संविधानानं सर्वांना समान संधी देणारी व्यवस्था तयार केल्याचं मुख्यमंत्र्यांचं नागपूरमधे प्रतिपादन

- बलात्कार प्रकरणी दोषी ठरलेला माजी खासदार प्रज्वल रेवाण्णा याला न्यायालयानं सुनावली आजन्म  कारावासाची शिक्षा

- जम्मू काश्मीरमध्ये सुरक्षा दलांसोबतच्या चकमकीत तीन दहशतवादी ठार

**आणि**

- इंग्लडविरोधातल्या पाचव्या कसोटी क्रिकेट सामन्याच्या दुसऱ्या डावात भारताच्या यशस्वी जयस्वालचं शतक

**<><><><><><>**

प्रधानमंत्री  किसान सन्मान निधी, म्हणजे शेतकऱ्यांच्या कल्याणाप्रति असलेल्या सरकारच्या वचनबद्धतेचा वस्तुपाठ असून, गेल्या दशकभरात शेतकऱ्यांच्या प्रत्येक समस्येचं  निराकरण करण्यासाठी सरकारने पूर्ण क्षमतेनं काम केल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. ते आज उत्तरप्रदेशमध्ये वाराणसी इथं प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेचा विसावा हप्ता जारी करताना बोलत होते. या हप्त्याअंतर्गत देशभरातल्या ९ कोटी ७० लाखांपेक्षा जास्त शेतकऱ्यांच्या बँक खात्यात २१ हजार  कोटी रुपये थेट हस्तांतरित केले जातील.

प्रधानमंत्री मोदी यांनी आज उत्तरप्रदेशमध्ये वाराणसी इथं सुमारे  २ हजार २०० कोटी रुपये खर्चाच्या विविध विकास कामांचं उदघाटन आणि पायाभरणी

केली. यावेळी त्यांनी 'दिव्यांगजन' आणि वृद्ध लाभार्थ्यांना ७ हजार ४०० सहाय्यक साहित्याचं वितरण केलं. त्यानंतर त्यांनी जनसभेला संबोधित केलं.

सणासुदीच्या काळात स्थानिक उत्पादनांना प्राधान्य देऊन ‘व्होकल फॉर लोकल’ला पाठबळ देण्याचं आवाहन त्यांनी यावेळी केलं.

**‘होल्ड बाईट’**

यासह प्रधानमंत्र्यांनी रस्ते सुधारणा, वीज प्रकल्प यांसह अनेक नवीन पायाभूत सुविधा आणि पुनर्विकासाशी संबंधित कामांची पायाभरणी आणि उद्घाटनही केलं. प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेच्या हप्ता वितरणाच्या निमित्तानं आज राज्यात मुंबईसह, जळगाव, मालेगाव आणि बुलडाणा इथंही विशेष कार्यक्रमांचं आयोजन केलं गेलं. केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव, केंद्रीय सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण राज्यमंत्री रामदास आठवले, केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे, मुरलीधर मोहोळ हे या विविध ठिकाणी झालेल्या कार्यक्रमात सहभागी झाले होते.

**<><><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आंध्र प्रदेशचे स्वातंत्र्य सैनिक पिंगळी वेंकय्या यांना त्यांच्या जयंतीनिमित्त आदरांजली वाहिली आहे. तिरंगा ध्वज तयार करण्यात वेंकय्या यांच्या महत्वाच्या भूमिकेबद्दल त्यांचं स्मरण केलं जातं, असं प्रधानमंत्री मोदी आपल्या समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हटले आहे. नागरिकांनी तिरंगा ध्वजाबरोबरचे त्यांचे सेल्फी किंवा फोटो हर घर तिरंगा डॉट कॉम या संकेतस्थळावर अपलोड करावेत असं आवाहनही प्रधानमंत्री मोदी यांनी केलं आहे.

**<><><><><><>**

भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी राष्ट्राला दिलेल्या संविधानानं देशात समतेचं राज्य निर्माण करण्यासह, सर्वांना समान संधी आणि प्रत्येक

व्यक्तीच्या स्वप्नपूर्तीसाठी व्यवस्था तयार करण्याचं काम केलं, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. नागपूर इथल्या डॉ आंबेडकर महाविद्यालयाच्या हीरक महोत्सवी सोहळ्यात ते आज बोलत होते.

या महाविद्यालयानं हजारो वंचित विद्यार्थ्यांच्या जीवनात परिवर्तन घडवलं असून, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा वारसा पुढे नेण्याचं कार्य करत असल्याचं ते म्हणाले.

**---बाईट--- देवेंद्र फडणवीस , मुख्यमंत्री.**

या कार्यक्रमाला सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई देखील उपस्थित होते. काही खोल्यांमध्ये सुरु झालेल्या या महाविद्यालयात आज विविध शाखांचं शिक्षण दिलं जात असल्याबद्दल न्यायमूर्ती भूषण गवई यांनी आनंद व्यक्त केला. बाबासाहेबांनी दिलेला सामाजिक आणि आर्थिक न्यायाचा संदेश आचरणात आण्याची गरजही त्यांनी व्यक्त केली.

**<><><><><>**

अश्लील व्हिडीओ आणि बलात्कार प्रकरणी दोषी ठरलेल्या माजी खासदार प्रज्वल रेवाण्णा याला, बंगळूरूमधल्या लोकप्रतिनिधींसाठी असलेल्या विशेष न्यायालयानं आज आजन्म कारावासाची शिक्षेसह १० लाख रुपये दंड ठोठावला. तसंच पीडितेला ७ लाख रुपये दंड स्वरूपात देण्याचे आदेश दिले. न्यायलयानं काल रेवाण्णा याला वारंवार बलात्कार, तसंच आपल्या पदाचा गैरवापर केल्या प्रकरणी दोषी ठरवलं होतं.

प्रज्वल रेवाण्णा याच्या विरोधात अशाच स्वरूपाचे आणखी तीन खटले सुरु आहेत.

**<><><><><>**

छत्तीसगडच्या बिलासपूर इथल्या एनआयए अर्थात राष्ट्रीय तपास संस्थेच्या न्यायालयानं केरळच्या दोन नन्सना आज जामीन मंजूर केला. मानवी तस्करी

आणि जबरदस्तीने धर्मांतर केल्याचा आरोप त्यांच्यावर आहे. गेल्या आठवड्यात छत्तीसगडच्या नारायणपूर इथं पोलिसांनी या दोन नन्सना आणि एका व्यक्तीला अटक केली होती.

<><><><><>

निवडणूक आयोगाने मतदार यादीत घोटाळा केल्याचे काँग्रेसकडे ठोस पुरावे असून या संस्थेनं आता आपली स्वायत्तता गमावली आहे, अशी टीका लोकसभेतले विरोधी पक्षने◌ेते राहुल गांधी यांनी केली. ते नवी दिल्लीत आयोजित वार्षिक विधी परिषदेला संबोधित करत होते. काँग्रेसनं गेली सहा महिने मतदार केंद्रनिहाय मतदान याद्यांची पडताळणी केली. मतदार याद्यातला घोटाळा काँग्रेस उघडकीस आणेल असं गांधी म्हणाले.

<><><><><>

जम्मू काश्मीरमधल्या कुलगाम जिल्ह्यातल्या अखल देवसर भागात आज सकाळी सुरक्षा दलांसोबत सुरू असलेल्या चकमकीत तीन दहशतवादी ठार झाले. या भागात दहशतवादी असल्याची माहिती सुरक्षा दलांना मिळाल्यानंतर काल संध्याकाळी शोधमोहीम सुरू करण्यात आली होती. लष्कर, जम्मू काश्मीर पोलीस आणि सीआरपीएफने संयुक्तपणे ही मोहीम राबवली. सुरक्षा दल आणि दहशतवादी यांच्यात रात्रभर गोळीबार सुरू होता.

<><><><><>

भारताला सी-२९५ लष्करी वाहतूक विमानांमधली शेवटची १६ विमानं प्राप्त झाली असून त्यामुळे भारताची संरक्षण क्षमता आणखी मजबूत झाली आहे. स्पेनमध्ये सेव्हील इथं भारताचे राजदूत दिनेश पटनाईक आणि भारतीय हवाईदलाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत हे हस्तांतरण झालं. नियमित वेळापत्रकाच्या दोन महिने आधी विमानं प्राप्त झाली आहेत. भारत आणि स्पेनमध्ये झालेल्या करारानुसार एकूण ५६ विमानं भारताला मिळणार आहेत.

<><><><><><>

नागपट्टिनम जिल्ह्यातल्या वेदारण्यम इथल्या चौदा मच्छिमारांवर आज श्रीलंकेच्या सागरी चाच्यांनी हल्ला केला. हे मच्छिमार तीन फायबर बोटींवर मासेमारीसाठी गेले होते. हल्लेखोरांनी या बोटींवरचे पाच लाख किमतीचे मासे, मासेमारीचं जाळं, डिझेल कॅन आणि जीपीएस उपकरणं पळवून नेली. हल्ल्यात जखमी झालेल्या मच्छिमारांना नागापट्टिनम इथल्या रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे.

<><><><><><>

हॉंगकॉंग वेधशाळेनं आज आठवड्यात दुसऱ्यांदा कृष्ण वादळाचा इशारा जारी केला आहे. या वादळामुळे जोरदार वारे वाहण्याची तसंच ताशी ७० मिलीमीटरहून जास्त पाऊस पडण्याची शक्यता आहे. या पार्श्व् भूमीवर हॉंगकॉंगच्या गृह व्यवहार मंत्रालयानं आपत्कालीन समन्वय केंद्र कार्यान्वित केलं आहे. या वादळामुळे सार्वजनिक सेवा स्थगित करण्यात आल्या आहेत.

<><><><><><>

अँडरसन-तेंडुलकर कसोटी क्रिकेट मालिकेतल्या पाचव्या आणि अखेरच्या सामन्यात आज तिसऱ्या दिवसाचा खेळ सुरू आहे.

भारतानं आज आपला दुसरा डाव कालच्या २ बाद ७५ धावसंख्येवरुन पुढे सुरू केला. काल नाबाद असलेल्या यशस्वी जयस्वाल यानं ११८ तर तर नाईट वॉचमन आकाशदीप यानं ६६ धावांची खेळी केली. या दोघांनी तिसऱ्या गड्यासाठी १०७ धावांची भागिदारी केली. मात्र कर्णधार शुभमन गील आणि करुण नायर लवकर बाद झाले.

शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा भारतानं दुसऱ्या डावात ६ गडी बाद २७८ धावा केल्या होत्या आणि भारताची आघाडी २५५ धावांवर पोहोचली होती.

<><><><><><>

ग्रँडमास्टर दिव्या देशमुखनं बुद्धिबळ या खेळातलं चीनचं वर्चस्व मोडीत काढलं याबद्दल एक भारतीय म्हणून तिचा अभिमान वाटत असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. फिडे महिला विश्वचषक बुद्धिबळ विजेती दिव्या देशमुख हिचा आज नागपूर इथं मुख्यमंत्र्यांच्या हस्ते पुरस्कार देऊन सत्कार झाला त्यावेळी ते बोलत होते. तीन  कोटी रुपयांचा धनादेश, स्मृती चिन्ह, प्रशस्तीपत्र असं या पुरस्काराचं स्वरूप आहे. यावेळी चेस असोसिएशनतर्फेही दिव्या देशमुखला ११ लाख रुपयांचा धनादेश देण्यात आला.

सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई यांनीही दिव्या हिच्या निवासस्थानी भेट देऊन तिचा गौरव केलं.

<><><><><><>

जळगाव इथं आज केंद्रीय युवक कल्याण आणि  क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसे यांच्या हस्ते ११ वर्षांखालील मुलामुलींच्या ३८ व्या राष्ट्रीय बुद्धिबळ स्पर्धेला सुरुवात झाली. देशभरातून ५०० पेक्षा अधिक खेळाडू  स्पर्धेत सहभागी झाले आहेत.

//<><><><><><>//